RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २२(२)] गुरुवार, एप्रिल २, २०२६/चैत्र १२, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, रायगड अलिबाग यांजकडून

**वाचले :-** १. मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ व ११६.

२. पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र. वाहतूक शाखा / वाहतूक आदेश / २०२६, १३१, दि.२०/०२/२०२६.

३. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.२६/०२/२०२६.

**वाहतूक बंदी अधिसूचना**

क्रमांक गृह / एमएजी-१/अलिबाग ते रेवदंडा / वाहतूक बंदी आदेश / / २०२६.— ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांनी उपोद्घातातील अ.क्र.२ कडील पत्रानुसार अलिबाग-कुरूळ-बेलकडे सहाण बायपास-नागाव-रेवदंडा तसेच अलिबाग-कुरूळ-नवेदरबेली-आक्षी - नागाव-रेवदंडा या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, मोरी/पुलाची कामे जोरदार सुरू असल्याने ठिकठिकाणी रस्त्यासाठी तसेच मोरी/पुल करीता खोदकामे करण्यात आलेली असून रस्ते अरुंद झालेले आहेत. सदर मार्गावरून दोन वाहने एकाच वेळी पास होत नसल्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्या वाहतूक कोंडीचा त्रास हा शालेय विद्यार्थी, स्थानिक नागरिक, पर्यटक तसेच रुग्ण घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका त्याचप्रमाणे इतर अत्यावश्यक वस्तुंची वाहतूक करणारे वाहन चालक यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सहाण बायपास, ढवर, बेलकडे, कुरूळ येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण, मोरी/पुलाची कामे चालू असल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहतूक कोंडीवर उपाययोजना म्हणून स्थानिक नागरीक, रुग्णवाहिका, विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या तसेच अपघाताचे प्रमाणे कमी करण्याच्यादृष्टीने उपाययोजना म्हणून दि. ३१/०५/२०२६ अखेर पर्यंत दररोज सकाळी ०९-०० ते दुपारी १२-०० वा. व सायं. १७-०० ते १९-०० वाजेपर्यंत अलिबाग-कुरूळ-बेलकडे-सहाण बायपास-नागाव- रेवदंडा तसेच अलिबाग-कुरूळ-नवेदर बेली - आक्षी - नागाव-रेवदंडा या दोन्ही मार्गावरील सर्व प्रकारची जड-अवजड वाहनांची वाहतूक (दुध, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना वगळून) बंदीबाबत अधिसूचना निघणेबाबत या कार्यालयाकडे विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचेकडील प्रस्तावाचे अवलोकन करता, अलिबाग ते रेवदंडा या मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु असल्याने स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याचे दृष्टीने तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने अलिबाग-कुरूळ-बेलकडे-सहाण बायपास-नागाव-रेवदंडा तसेच अलिबाग-कुरूळ-नवेदर बेली- आक्षी-नागाव-रेवदंडा या दोन्ही मार्गावर दररोज सकाळी ०९-०० ते दुपारी १२-०० वा. व सायं. १७-०० ते १९-०० वाजेपर्यंत सर्व प्रकारची जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद करणेबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, जिल्हादंडाधिकारी रायगड उपोद्घातातील अ.क्र. १ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याचे दृष्टीने तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने अलिबाग- कुरूळ-बेलकडे सहाण बायपास-नागाव-रेवदंडा तसेच अलिबाग- कुरूळ- नवेदर बेली - आक्षी - नागाव-रेवदंडा या दोन्ही मार्गावर या आदेशाचे दिनांकापासून ते दिनांक ३१/०५/२०२६ रोजी पर्यंत दररोज सकाळी ०९-०० ते दुपारी १२-०० वा. व सायं. १७-०० ते १९-०० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद करणेबाबत आदेश जारी करीत आहे.

सदरची वाहतूक बंदी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने यांना लागू राहणार नाही.

रायगड-अलिबाग,
दिनांक २६ फेब्रुवारी २०२६.

**किशन ना. जावळे,**
जिल्हादंडाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.